# मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर

## रिट याचिका क्रमांक 3987 / 2018

1. सौ. शकुंतलाबाई उर्फ सीमा सुरेशसिंग गौर,
   वय अंदाजे 60 वर्षे, व्यवसाय : शेती,
   राहणार – बी – 2, कॉर्पोरेशन कॉलनी,
   उत्तर अंबाझरी रोड, नागपूर.

2. रामसिंग गंगारामसिंग बिसेन,
   वय अंदाजे 47 वर्षे, व्यवसाय : शेती,
   राहणार – बिसेन कॉम्प्लेक्स, श्रावगी प्लॉट्स,
   अकोला, तहसील आणि जिल्हा :अकोला **.... याचिकाकर्ते**

**//विरुद्ध//**

प्रेमसिंग गंगारामसिंग बिसेन,
(मृत) वैध प्रतिनिधीमार्फत

1. विधवा श्रीमती सुशीलादेवी प्रेमसिंग बिसेन,
   वय अंदाजे 60 वर्षे, व्यवसाय : घरकाम,

2. रूपेसिंग प्रेमसिंग बिसेन,
   वय अंदाजे 35 वर्षे, व्यवसाय : व्यापार,

3. रितेशसिंग प्रेमसिंग बिसेन,
   वय अंदाजे 35 वर्षे, व्यवसाय : व्यापार,

उत्तरवादी क्रमांक 1 ते 3 राहणार – बिसेन कॉम्प्लेक्स,
टॉवर जवळ, श्रावगी प्लॉट्स, अकोला

4. सौ. वैशाली दिपकसिंग राठोड,
वय अंदाजे 37 वर्षे, व्यवसाय : घरकाम,
राहणार – कैलाश नगर, प्लॉट क्रमांक 79/102,
आदिलाबाद, जिल्हा आदिलाबाद (आंध्र प्रदेश)

5. सौ. नेहा कृपालसिंग ठाकूर,
वय अंदाजे 37 वर्षे, व्यवसाय : घरकाम,
राहणार – 307, नवी पेठ, सुखसागर हॉटेल जवळ,
रेल्वे स्टेशन, जळगाव
खानदेश, तहसील आणि जिल्हाः जळगाव
(खानदेश) ................ **उत्तरवादी**

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –

याचिकाकर्त्यांचे अधिवक्ता – श्री. व्ही. डी. मुळे.
उत्तरवादीसाठी – कोणीही नाही.

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –

**न्यायमंच : अनिल एस. किलोर, न्यायमूर्ति**

**तारीख: 2 फेब्रुवारी 2023**

**मौखिक न्यायनिर्णय :**

1. याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले. मात्र, उत्तरवादीला नोटीस तामील करूनही, कोणीही हजर नाही.

2. अधिनिर्णित उत्तर तत्काल मागवण्यात आले.

3. तदर्थ जिल्हा न्यायाधीश–1, अकोला यांनी किरकोळ दिवाणी अपील क्र. 69 / 2013 मध्ये दिनांक 15/06/2018 रोजी पारित केलेला न्यायनिर्णय ज्या आदेशाद्वारे मनाई हुकूमचा आदेश उलटवून अपील मंजूर केली, त्या आदेशाला या रिट याचिकेत

आव्हान देण्यात आले आहे.

४. याचिकाकर्ता हा मूळ वादी आहे ज्यांनी घोषणा आणि कायमस्वरुपी निषेधाज्ञाच्या आदेश करिता दाव्यासोबत अंतरिम मनाई हुकूमाकरिता अर्ज निशाणी क्रमांक 5 सोबत दाखल केला, ज्याद्वारे दाव्याचा अंतिम निपटारा होईपर्यंत वादग्रस्त शेतजमिनीवर वादींच्या ताब्याला कोणत्याही प्रकारे प्रतिवादींनी अडथळा करू नये ह्याकरिता प्रतिवादींना रोखण्याची प्रार्थना केली. विद्वान न्यायचौकशी न्यायालयाने हे ग्राह्य धरल्यानंतर की वादींकडे दावा संपत्तीचा ताबा आहे, दिनांक 08.03.2013 रोजी आदेश निशाणी क्रमांक 5 खाली अंतरिम निषेधाज्ञा मंजूर केली.

5. या अंतरिम मनाई आदेशाने व्यथित होऊन प्रतिवादींनी तदर्थ जिल्हा न्यायाधीश–1, अकोला यांच्यासमक्ष किरकोळ दिवाणी अपील क्र. 69 / 2013 दाखल केली, ज्यामध्ये विद्वान कनिष्ठ अपीलीय न्यायालयाने स्पष्टपणे ग्राह्य धरले की प्रतिवादी दावा मिळकत आपल्या ताब्यात असल्याचे सिद्ध करण्यात अपयशी ठरले आहे आणि म्हणून ,विद्वान न्यायचौकशी न्यायालयाने हा योग्य निष्कर्ष काढला की सकृतदर्शनी वादीचा दावा मिळकतीवर ताबा आहे व वादी हे चांगल्या हेतूने आलेले नाही असे निरीक्षण करून वादींविरूद्ध अपील मान्य केली.

6. याचिकाकर्त्यांच्या विद्वान अधिवक्त्यानी निदर्शनास आणून दिले की, अपील मंजूर केल्यानंतर या न्यायालयाने दिनांक 9 जुलै 2018 रोजी दिलेल्या आदेशानुसार न्यायचौकशी न्यायालयाने दिलेला मनाई आदेश पुढे चालू ठेवला आणि अशा प्रकारे 08.03.2013 पासून म्हणजेच सुमारे १० वर्षांपासून याचिकाकर्त्यांच्या बाजूने मनाई आदेश आहे. त्यामुळे, हे सादर केले जाते की दोन्ही कनिष्ठ न्यायालयांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की वादीचा दावा मिळकतीवर ताबा आहे, त्यामुळे न्यायचौकशी न्यायालयाने दिलेला मनाई आदेश कायम ठेवणे आवश्यक आहे.

7. ह्याविषयी वाद नाही की दोन्ही न्यायालयांनी एकाच वेळी असा निर्णय दिला आहे की वादीचा दावा मिळकतीवर ताबा आहे. तथापि, अपील मंजूर करताना विद्वान कनिष्ठ अपीलीय न्यायालयाने नोंदवलेल्या इतर निष्कर्षांचा विचार केला तर तो दाव्याचा विषय आहे. या परिस्थितीत हे सत्य कायम आहे की, गेल्या दहा वर्षांपासून वादींच्या बाजूने तात्पुरता मनाई आदेश चालू आहे.

8. या परिस्थितीत, माझ्या मते न्यायचौकशी न्यायालयाने अपील मंजूर करण्याचा न्यायनिर्णय आणि तात्पुरता मनाई आदेश रदद करण्याचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे आहे आणि दावा जलदगतीने चालवण्यासाठी न्यायचौकशी न्यायालयाला निर्देश देण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार, मी पुढील आदेश पारित करित आहे :

i) रिट याचिका मंजूर.

ii) तदर्थ जिल्हा न्यायाधीश –1, अकोला यांनी किरकोळ दिवाणी अपील क्र. 69/2013 मध्ये दिनांक 15/06/2018 रोजी पारित केलेला न्यायनिर्णय याद्वारे रद्द करण्यात येत आहे आणि त्यानुसार विद्वान 3 रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अकोला यांनी नियमित दिवाणी दावा क्रमांक 948 / 2012 मध्ये दिनांक 08.03.2013 रोजी निशाणी क्रमांक 5 आणि 22 वर पारित आदेश कायम करण्यात येतो.

iii) न्यायचौकशी न्यायालयाला असे निर्देश देण्यात येत आहे की दावा जलदगतीने निकाली काढावा.

त्यानुसार अधिनिर्णय कायम करण्यात येतो. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

**(अनिल एस. किलोर,न्यायमूर्ति )**

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".